# घर

माणसाच्या मूलभूत सुविधा म्हणजे अन्न, वस्त्र आणि निवारा. ह्या तिन्ही गोष्टींच्या पूर्ततेसाठी तो प्रचंड मेहनत करतो कारण त्या त्याच्या अस्तित्वालाच आव्हान देत असतात. त्यापैकी अन्न आणि वस्त्र ही गरज दैनंदिन निकडीने भागवावीच लागते, मात्र निवारा किंवा घर हा एक अत्यंतिक निकडीची पण भावनिक गरज आहे. घर किंवा निवारा ह्याचा हेतू फक्त निसर्गापासून संरक्षण इतकाच मर्यादित न राहता त्यात भावनिक गुंतवणूक आणि भविष्याच्या नियोजनाची एक बेगमी असते.

घर भले ते स्वतःच्या मालकीचे असो वा भाड्याचे, ते उभारताना, प्राप्त परिस्थिती आणि नजीकच्या भविष्यकाळातील नियोजन यांचा विचार करूनच घराची निवड केलेली असते.
घर ही वास्तू फक्त चार भिंती आणि छप्पर अश्या निर्जीव संकल्पनेपुरती मर्यादित न राहता, भावनिक बंध आणि नातेसंबंधांचा ओलावा अश्या बाबींनी त्या निर्जीव वास्तूला जणू सजीवता प्राप्त होते.

घर आणि घराची उभारणी हे दोन्ही वेगळे विषय आहेत. स्थापत्यशास्त्राच्या नियमानुसार तसेच उपभोक्त्याच्या उपलब्ध आर्थिक निकषांवर आधारित आणि भविष्याचा विचार करता वास्तूची निर्मिती होत असते. मात्र त्या निर्जीव वास्तूला प्राप्त गरजा आणि भावनिक गुंतवणुकीच्या साह्याने एक प्रकारची सजीवता प्राप्त होते.

घर किंवा वास्तू किती मोठी? यावर त्याचे घरपण अवलंबून नसते तर त्या घरात, वास्तव्य करणाऱ्या कुटुंबातील परस्परप्रति असलेला जिव्हाळा, प्रेम आणि मायेचा ओलावा यावर घराचे घरपण अवलंबून असते.

काही घरं एवढी मोठी आणि अति टापटीप असतात. घर स्वच्छ नीटनेटके असणे वेगळे आणि घरातील स्वच्छतेचा अतिरेक वेगळा. काही घरं आणि त्यातील अंतर्गत सजावटी इतक्या महागड्या असतात की आलेल्या पाहुण्याला अवघडल्यासारखं होतं. त्यावेळी कळत नाही हे घर आहे का महागड्या हॉटेलमधल्या खोल्या.

घर इतपत नेटनेटके असावे की स्वच्छता आणि आरोग्याला पूरक वातावरण असावे. मात्र त्या स्वच्छता आणि टापटिपीसोबत घरातील परस्पर सदस्यांच्या जिव्हाळ्यासोबत प्रत्येकाची personal

space जपली जावी. ह्या personal space साठी अगदी मोठ्या जागेची गरज नसते, पण एकमेकांचा आदरभाव जपला आणि नात्यांचा आदर राखला तरी प्रत्येकाची space आपोआप जपली जाते. काही घरांत प्रत्येकाचे स्वतंत्र शयनकक्ष असते, मोठा दिवाणखाना आणि मोठी जागा, मात्र परिवारातील सदस्यांमध्ये सुसंवाद नसतो, कदाचित प्रत्येकजण स्वतःच्या विश्वात इतका रममाण असतो की दुसऱ्याच्या अस्तित्वाचे भानही उरत नाही. अश्या घराला घरपण प्राप्त होत नाही.

घराचं घरपण हे घरातील सदस्यांच्या निकोप नातेसंबंधांवर आधारित असते पण त्याचसोबत घरातील स्त्रियांचा आदरभाव आणि त्यांचा सहभाग ह्यावर बहुतांशी अवलंबून असते. घरातील स्त्री ही गृहलक्ष्मी असतेच पण ती घराला खऱ्या अर्थाने घरपण देते. घरातील स्वच्छता, नेटनेटकेपणा सांभाळताना घरातील जेष्ठ व्यक्तींचा आदर, त्यांच्या गरजा, पती, अपत्ये ह्यांची काळजी घेत असतानाच आल्यागेल्याची विचारपूस आणि पाहुणचार अशी तारेवरची कसरत त्या गृहलक्षीमुळेच शक्य होते. घरातील विविध सदस्य हे जणू विविध फुलं असतील तर ही गृहलक्ष्मी त्यांना जोडणारा समान 'धागा' होय.

घराचे घरपण हे त्या घरातील स्त्रीमुळे टिकून असते आणि कोणत्याही पुरूषाचा प्रपंच हा त्याच्या पत्नीच्या योग्य साथीमुळेच वाढत आणि घडत असतो.

स्त्रीशिवाय घर हे घरच रहात नाही, ज्या घरात स्रियांचा वावर नाही अश्या घराला एक अवकळा प्राप्त होत असते.

लोक घरात थांबायला कंटाळतात आणि जणू त्यांना बाहेर फिरायची जणू ओढ लागते. आजकाल शहरी वातावरणात तर weekend हा जणू घराबाहेरच घालवायचा असा जणू शिरस्ता ठरलाय. जरा शांतपणे घरात बसावं आणि विचार करावा. हे घर, वास्तू ह्यात किती आनंदाने आणि समाधानाने राहता येतं. त्या वास्तुकडे एका वेगळ्या दृष्टिकोनातून बघितले तर प्रत्येक गोष्ट जणू आपलीशी वाटू लागते. आपलेच घर सामूहिकतेने कधी आवरायला घ्यावे, किती आठवणी जणू जिवंत होतात. घरातली प्रत्येक वस्तूवरील धूळ जरी साफ करत असलो यार त्या निर्जीव वस्तूंच्या मागे एक आठवणींचा साठा असतो त्या आठवणी पुन्हा ताज्या होतात. घरातला प्रत्येक कोपरा साफ करताना गतस्मृती जागृत होतात. घरातील अनावश्यक वस्तू ज्याला आपण फाफट पसारा म्हणतो तो कधी टाकून देण्यास आपले मन तयार होत नाही कारण त्या निर्जीव वस्तू आपल्या सोबत गतस्मृतींचे फेर धरून भावनिक बंधनात अडकवतात. एखादी जुनी गोधडी अथवा शाल मायेच्या उबेची आठवण करून देते आणि जणू मन मग भूतकाळातील स्मृतीत हरखून जात. घरात कुंडीत लावलेलं रोपटं आणि त्याला आलेली फुलं, ताजी पान ह्याकडे आपले लक्षच जात नाही. त्याच कुंडीकडे बारकाईने बघितले

की जणू एक परसबाग फुलल्याचा आनंद प्राप्त होतो. घरातील दिवाणखाना हा जसा पाहुण्यांच्या आणि बाहेरील व्यक्तींच्या आदरातिथ्याची जागा असते तसेच ती कुटुंबातील सदस्यांच्या मैफिलीची जागा असते. मैफिल ही काय फक्त संगीताचीच नसून गप्पांचा जमलेला फड आणि त्यातील हास्यविनोद, सुसंवाद हा कौटुंबिक मैफिलीचा भागच असतो. Dining table वर कुटुंबातील सदस्यांचे एकत्रित जेवण हा घरातील घरपणाचा अविभाज्य घटक आहे.
'Family who eats together, always stays together.'

घराला घरपण घरातील निर्जीव वस्तूने मिळत नाही तर घरातील सदस्याचा परस्पराप्रति असलेला जिव्हाळा, प्रेम आणि वात्सल्य ह्यामुळेच घराचे घरपण टिकून राहते. ह्यामुळे घरातीलनिर्जीव वस्तुंना जणू सजीवता प्राप्त होते.

घरात नकारात्मक विचार, राग, लोभ, मत्सर आदी गोष्टींना थारा नको. घर हे समाधान, आनंद आणि प्रेमपूर्ण वातावरणाने भरलेले हवे. ह्या सकारात्मक विचार आणि ऊर्जेमुळे घरातील प्रेम, वात्सल्य आणि जिव्हाळा टिकून राहतो. ज्या घरात लेकी, सुना आणि जेष्ठ स्त्रिया आनंदाने आणि हसत खेळत राहतात त्याच घरात खरा लक्ष्मीचा वावर राहतो. घरात नेहेमी आनंदी वातावरण आणि सकारात्मक वातावरण हवे कारण त्याच आनंदी वातावरणाला ही गृहदेवता आशीर्वाद देत असते.

वास्तू नेहेमी 'तथास्तु' म्हणते त्यामुळे आपणच ठरवावं - आपल्या वास्तूत आपण आनंदाने, समाधानाने राहावं का उगीच कुढतकुढत राग, लोभ सांभाळत दिवस व्यतित करावे.

"A house is made of bricks and beams. A home is made of hopes and dreams."

**-मनोज कुरुंभटी**